# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २०० वा ❑ भारतीय सौर दिनांक ७ आश्विन शके १९४८, मंगळवार दि.२९ सप्टेंबर २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### महाराष्ट्रातील ७५ टक्के भागातील भीषण दुष्काळ आणि शासकीय दिलासा

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला आणि शेतकरी वर्गाला वारंवार ग्रासणाऱ्या निसर्गाच्या लहरीपणाने यंदा पुन्हा एकदा अत्यंत गंभीर स्वरूप धारण केले आहे. मान्सूनच्या प्रदीर्घ खंडामुळे आणि अपुऱ्या पावसामुळे निर्माण झालेल्या भीषण पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर, राज्यभरात लाडक्या गणपती बाप्पाला निरोप देत असतानाच राज्य सरकारने एक ऐतिहासिक आणि दूरगामी निर्णय घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी तब्बल २६५ तालुक्यांमध्ये अधिकृतरीत्या दुष्काळ जाहीर केला. राज्याच्या एकूण भौगोलिक व प्रशासकीय क्षेत्राचा विचार करता, सुमारे ७५ टक्के महाराष्ट्र दुष्काळाच्या छायेत आल्याचे शासनाने मान्य केले आहे. पावसाअभावी करपलेली पिके, कोरडे पडलेले पाण्याचे स्रोत आणि संकटात सापडलेला ग्रामीण समाज यांना सावरण्यासाठी हा निर्णय अत्यंत वेळेवर आणि आवश्यक मानला जात आहे.

या दुष्काळाचे गांभीर्य केवळ आकडेवारीपुरते अथवा शेतीच्या नुकसानीपुरते मर्यादित राहिलेले नसून त्याचे रूपांतर एका गंभीर सामाजिक अरिष्टात झाले आहे. पाऊस नाही आणि प्यायला पुरेसे पाणी नाही, अशा दुहेरी कात्रीत सापडलेल्या तरुण शेतकऱ्यांसमोर उदरनिर्वाहाबरोबरच सामाजिक प्रतिष्ठेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील तरुणांची लग्ने जमेनाशी झाली आहेत, ही एका तरुण शेतकऱ्याने थेट मुख्यमंत्र्यांसमोर मांडलेली व्यथा राज्यातील विदारक वास्तव अधोरेखित करते. शेतीतील अनिश्चितता केवळ आर्थिक दिवाळखोरी आणत नाही, तर ती संपूर्ण कुटुंबाची सामाजिक वीण उसवून टाकते. अशा विदारक वातावरणात शासनाने दुष्काळ जाहीर केल्यामुळे हवालदिल झालेल्या बळीराजाला आणि ग्रामीण जनतेला जगण्याचे बळ मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

हा निर्णय जाहीर होण्यामागे प्रशासकीय पाहणी आणि राजकीय दबाव या दोन्ही घटकांची मोठी भूमिका राहिली आहे. गेल्या काही आठवड्यांपासून प्रत्येक जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांकडून आपापल्या भागातील दुष्काळी परिस्थितीचा, पाणीसाठ्याचा आणि पिकांच्या नुकसानीचा सविस्तर आढावा घेतला जात होता. खुद्द मुख्यमंत्र्यांनीही प्रत्यक्ष बांधावर जाऊन एका दिवसाचा दुष्काळी दौरा केला होता. दुसरीकडे, विरोधी पक्षांनी या मुद्द्यावरून सरकारवर सातत्याने दबाव आणला होता. शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी दुष्काळग्रस्त भागाचा तातडीचा दौरा करून शेतकऱ्यांचे गारगाऱ्हाणे चव्हाट्यावर आणले होते, तर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही दुष्काळाची भीषण दाहकता लक्षात घेऊन स्वतः मैदानात उतरण्याची आणि दुष्काळी दौरे करण्याची घोषणा केली होती. या सर्व राजकीय घडामोडींमुळे आणि प्रत्यक्ष जमिनीवरील वस्तुस्थितीच्या दबावामुळे शासनाला दिरंगाई न करता तातडीने दुष्काळ जाहीर करण्याचा निर्णय घेणे भाग पडले.

दुष्काळ जाहीर झाल्यामुळे राज्यातील बाधित भागातील शेतकऱ्यांसाठी १० प्रमुख लाभ आणि सवलतींची घोषणा करण्यात आली आहे. आर्थिक पातळीवर शेतकऱ्यांना मोठा दिलासा देण्यासाठी जमीन महसुलात पूर्ण सूट देण्यात आली आहे. यासोबतच, खरीप आणि रब्बी हंगामातील पीक कर्जांचे पुनर्गठन करण्याचे निर्देश बँकांना देण्यात आले असून शेतीशी निगडित सर्व प्रकारच्या कर्जांच्या सक्तीच्या वसुलीला तत्काळ स्थगिती देण्यात आली आहे. यामुळे वसुलीच्या तगाद्यातून शेतकऱ्यांची तात्पुरती मुक्तता होणार आहे. ऊर्जा क्षेत्राच्या दृष्टीने, कृषीपंपांच्या चालू वीजबिलात सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ७.५ हॉर्सपॉवर क्षमतेच्या कृषीपंपांचे वीज बिल आधीच माफ करण्यात आले होते, आता त्यावरील क्षमतेच्या वीजपंपांनाही वीजबिलात विशेष सवलत लागू होणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, टंचाईग्रस्त जाहीर केलेल्या कोणत्याही गावामध्ये शेतकऱ्यांच्या शेतीपंपांची वीजजोडणी कोणत्याही कारणास्तव खंडित न करण्याचे सक्त आदेश महावितरणला देण्यात आले आहेत.

ग्रामीण भागातील उपजीविका टिकून राहावी आणि दुष्काळामुळे होणारे स्थलांतर रोखले जावे, यासाठी व्यापक कल्याणकारी तरतुदी करण्यात आल्या आहेत. दुष्काळामुळे शेतीतील रोजगार बुडाल्याने शेतीवर पूर्णपणे अवलंबून असणारे अल्पभूधारक शेतकरी आणि शेतमजूर यांच्यासाठी शासनाकडून मोफत अन्नधान्य पुरवण्याची व्यवस्था केली जाणार आहे. हाताला काम देण्यासाठी रोजगार हमी योजनेच्या जाचक अटी आणि नियमांमध्ये शिथिलता आणून खेडोपाडी अधिकाधिक सार्वजनिक कामे सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या संकटकाळात शेतकऱ्यांच्या मुलांचे शिक्षण थांबू नये, म्हणून दुष्काळग्रस्त भागातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा संवेदनशील निर्णय सरकारने घेतला आहे.

पाणी आणि पशुधनाचे रक्षण हा दुष्काळ निवारणाचा सर्वात महत्त्वाचा पैलू आहे. ज्या गावांमध्ये आणि वाड्या-वस्त्यांवर पिण्याच्या पाण्याची टंचाई तीव्र झाली आहे, तिथे आवश्यकतेनुसार तातडीने पिण्याच्या पाण्याचे टँकर्स सुरू करण्यात येत आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार असलेल्या जनावरांना जगवण्यासाठी चारा छावण्या उभारण्याचे आदेश देण्यात आले असून जनावरांच्या चाऱ्याची आणि पाण्याची व्यवस्था युद्धपातळीवर सुरू ठेवण्यात येणार आहे. केवळ तात्पुरती मलमपट्टी न करता, दीर्घकालीन जलसुरक्षिततेसाठी मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाची कामे हाती घेण्याची आखणी करण्यात आली आहे. पिण्याचे पाणी आणि पशुधनासाठी लागणारे पाणी यांचे नियोजन यापूर्वी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्राधान्याने सुरूच ठेवले जाणार आहे.

शासनाने घेतलेल्या या महत्त्वपूर्ण निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी पारदर्शक, अचूक आणि गतिमान पद्धतीने व्हावी यासाठी प्रशासकीय यंत्रणेला कडक सूचना देण्यात आल्या आहेत. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील पिकांच्या नुकसानीचे पंचनामे विहित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या प्रक्रियेत पारदर्शकता टिकून राहावी आणि खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत मदत पोहोचावी यासाठी पिकांची प्रत्यक्ष स्थिती दर्शवणारी छायाचित्रे जीपीएस तंत्रज्ञानाचा वापर करून संकलित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. कागदावरील आदेश आणि जमिनीवरील प्रत्यक्ष अंमलबजावणी यातील अंतर कमी करणे हेच या दुष्काळ निवारणाचे सर्वात मोठे आव्हान असणार आहे. महसूल, कृषी, जलसंपदा आणि ऊर्जा या सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम केल्यास, राज्यावरील या ७५ टक्के दुष्काळाची दाहकता कमी करून बळीराजाला संकटातून बाहेर काढणे शक्य होईल.

# आठवणींची बरणी किंवा डब्बा

## एक उत्तम जीवन उपक्रम किंवा प्रयोग

ज्योतिर्मय साहित्य

हो ! बरोबर वाचले आपण आठवणींची बरणी किंवा डब्बा मलाही हा शब्द लिहिताना जरा मजा वाटल्याने आपण काय लिहित आहोत असे वाटले, पण लिहायचंच!हा मनाचा विचार आपण मांडावा असे मला वाटले. आपण रोज खूप अनुभवातून जात असतो. चांगले, वाईट दोन्हीही अनुभव आपल्याला येतात. या अनुभवातून आपल्याला कधी आनंद होतो कधी खूप हर्ष होतो तर कधी दुःख होतं. तर हा एक उपक्रम आपण राबवून बघूया असे मला वाटले. या वेगळ्या उपक्रमासाठी लागणारे साहित्य काय आहे ते पाहूया...

उपक्रम – आठवणींचा डब्बा



केव्हा बरणी

साहित्य – एक छानसा डब्बा अथवा बरणी, आपल्या आवडीचे पेन, आपल्याला आवडतील त्या कागदाचे वेगवेगळ्या आकारातील छोट्या चिठ्ठ्या.

उपक्रम कृती – दिवसभर आपल्याला आलेल्या अनुभवातून दोन चांगले व मनाला सुख देणारे आनंद देणारे असे अनुभव आपण त्या चिठ्ठी मध्ये लिहायचे आणि ती चिठ्ठी बंद करून त्या बरणीमध्ये अथवा डब्यामध्ये टाकायची. एक नियम इथे पाळायचा ज्या घटनेनं आपल्याला इजा झाली आहे मनाला दुःख झालेल आहे, आपल्या मनाला त्या गोष्टी पटल्या नाहीत त्या गोष्टी या चिठ्ठी मध्ये लिहायच्या नाहीत. असे साधारण महिनाभर करायचे.

निरीक्षण – महिन्याभराने जेव्हा आपण एखाद्या गोष्टीनं खूप त्रासलेलं असू किंवा अतिशय मनाला दुःख झाले असेल त्यावेळेला हा डबा उघडायचा त्यातील एक,एक आठवणींमध्ये रमायचं आणि त्या रमलेल्या आठवणीमध्ये आपलं दुःख कधी विसरून जाऊ हे सुद्धा आपल्याला कळणार नाही तर हे झाले आपले निरीक्षण आपणच केलेले.

अनुमान – या उपक्रमाद्वारे आपण केलेल्या काही छान गोष्टींचे वाचन करून आपल्या मनाला जो आठवणींचा आनंद मिळणार आहे.तो जगात कुठेही मिळणार नाही.त्या आठवणी स्मरून आपण पुन्हा त्या आठवणींमध्ये रमत जातो आणि आनंद घेतो. आलेल्या दुःखाला आपण डावलतो निश्चितच.हा उपाय सर्वांनी करून पहावा मी स्वतः केलेला आहे त्यामुळे मला याच्यातून खूप आनंद मिळतो.

आनंद या जीवनाचा
सुगंधापरी दरवळावा...


लेखिका -
वसुधा वैभव नाईक,
पुणे. मो. 9823582116




# “पितरांना श्रद्धा द्या, ते शक्ती देतील....”

ज्योतिर्मय साहित्य

यावर चिंतन करण्याआधी एक साधे उदाहरण लक्षात घेता येईल.

आपण कुणाला दूर असलेल्या व्यक्तीला जन्मदिन शुभेच्छा देतो, पुष्प गुच्छाचा व मिठाईचा फोटो पाठवतो. प्रत्यक्ष त्या व्यक्तीला यातील काहीच मिळत नाही पण न सुगंध घेता, न चव घेता ही त्या व्यक्तीला समाधान मिळते! याउलट या सगळ्या आभासी असणाऱ्या गोष्टी जर नाही पाठवल्यात तर त्या व्यक्तीला काहीही प्रत्यक्ष मिळणार नसूनही त्याला वाईट वाटते मग याचा अर्थ काय?

या सगळ्या गोष्टी सूक्ष्मात घडत असतात , स्थूलात घडो किंवा न घडो!

आणखी एक प्रसंग फारच हृदयस्पर्शी आहे!

श्रीराम जेव्हा दशरथांसाठी तर्पण विधी करत होते, तर सीतामाई अचानक त्या ब्राह्मणांपासून दूर गेल्या व लपून बसल्या. विचारले का तर त्या म्हणाल्या,‘‘ ब्राह्मण देवांच्या जागी मला प्रत्यक्ष सासरे दिसत आहेत मी समोर कशी येणार?‘‘ जशी श्रध्दा तसा परिणाम!

श्रद्धया दीयते यस्मात् श्राद्धं तेन प्रकीर्तितम्।
पितृन्मुद्दिश्य विप्रैश्च दत्तं श्राद्धमुदाहृतम्।।

(पितृपक्ष, श्राद्ध आणि तर्पण यांसारख्या



प्राचीन भारतीय परंपरांच्या मागे दडलेली आध्यात्मिक, तात्त्विक, वैज्ञानिक आणि मानसशास्त्रीय बाजू समजणे आवश्यक आहे )

मानवाच्या मनात मृत्यूनंतरच्या जीवनाविषयी प्राचीन काळापासूनच एक स्वाभाविक जिज्ञासा आहे

मृत्यूनंतर शरीर नष्ट झाले की आत्म्याचे अस्तित्वही संपते का? की आत्मा एखाद्या सूक्ष्म रूपात अस्तित्वात राहून आपल्या प्रियजनांशी काही प्रकारे जोडलेली असते?

या प्रश्नांचा विचार भारतीय तत्त्वज्ञान, शास्त्रवचने तसेच जगातील विविध ठिकाणी नोंदविलेल्या अनुभवांच्या आधारे या ग्रंथात करण्यात आला आहे.

पितर ही भय निर्माण करणारी किंवा अनिष्ट शक्ती नसून, उच्च संस्कार असलेल्या, स्नेहशील आणि मार्गदर्शक अशा सूक्ष्म सत्ता आहेत. श्रद्धेने त्यांच्याशी जोडले गेल्यास मनुष्याला शक्ती, प्रकाश, प्रेरणा आणि सहकार्य मिळू शकते.

१. जीवात्मा, मृत्यू आणि सूक्ष्म शरीराचे अस्तित्व

मृत्यूनंतर स्थूल शरीराचा अंत होतो; परंतु जीवात्म्याचे अस्तित्व संपत नाही. मृत्यू आणि पुनर्जन्म यांमधील अवस्थेत जीवात्मा सूक्ष्म शरीरासह सूक्ष्म जगतात राहते, असे मानले आहे.

सामान्य आत्म्यांमध्ये अपूर्ण इच्छा, वासना, मोह, राग-द्वेष इत्यादी राहिल्यास त्या विविध सूक्ष्म अनुभवांना कारणीभूत होऊ शकतात. त्याउलट उच्च संस्कार आणि सद्भावना असलेल्या आत्म्यांना ‘पितर’ असे संबोधले जाते.

२. पितर कोण आहेत?

पितर म्हणजे केवळ भूत-प्रेत नव्हेत.

ते देवतांपेक्षा भिन्न, परंतु सामान्य मनुष्यांपेक्षा उच्च स्तरावरील श्रेष्ठ अशरीरी आत्मे आहेत.त्यांच्या मनात आपल्या कुटुंबीयांविषयी स्नेह, करुणा आणि मार्गदर्शनाची भावना असते.

कुमार्ग, अन्याय आणि अधर्म यांचा त्यांना तिटकारा असतो; तर सदाचार, सत्य आणि सन्मार्ग यांचा स्वीकार करणाऱ्यांविषयी त्यांना प्रसन्नता असते.

३. श्राद्ध आणि तर्पणाचे वास्तविक स्वरूप

आज अनेकदा श्राद्ध आणि तर्पण यांकडे केवळ कर्मकांड म्हणून पाहिले जाते. परंतु त्यामागील मूलभूत भावना विसरली जाते.

पितरांना केवळ स्थूल अन्न किंवा भौतिक वस्तूंची गरज नसते; त्यांच्यापर्यंत पोहोचणारी खरी गोष्ट म्हणजे

श्रद्धा, प्रेम, कृतज्ञता आणि सद्भावना.

(क्रमशः)


|| अध्यात्म ||
अपर्णा परांजपे
पुणे मो. 95030 45495




# सखी शेजारीण माझी श्रद्धा

ज्योतिर्मय साहित्य

‘‘मित्र असावा गारव्यासारखा,
मनाला नेहमी सुखावणारा,
फुलांसारखा हसवणारा,
आणि सावलीसारखा साथ देणारा.‘‘

ही चारोळी वाचली की मला सर्वप्रथम आठवण येते ती माझ्या जिवाभावाच्या सखीची. योगायोग असा की तिचे नावच श्रद्धा आहे आणि त्यामुळे माझी तिच्यावर असलेली श्रद्धा आणखी दृढ झाली आहे. काही माणसे आपल्या आयुष्यात नकळत येतात आणि हळूहळू आपल्या जगण्याचा अविभाज्य भाग बनून जातात. श्रद्धा माझ्यासाठी अशीच एक व्यक्ती आहे. ती केवळ माझी शेजारीण नाही, तर माझ्या मनातील भावना ओळखणारी, सुख-दुःखात साथ देणारी आणि जीवाला जीव देणारी सखी आहे.

आमची मैत्री कधी आणि कशी झाली हे सांगणे कठीण आहे. ती माझ्या शेजारी राहते. रोज पहाटे अंगणात रांगोळी काढताना आमची भेट होते. सुरुवातीला काही निवडक शब्दांची देवाणघेवाण व्हायची. पण रांगोळीचे ठिपके जोडत असताना कधी आमचे विचार जोडले गेले, कधी मनांची वीण जुळली आणि कधी एकमेकींच्या सुख-दुःखांचा आम्ही भाग झालो, हे आम्हालाही कळले नाही. त्या पहाटेच्या प्रसन्न वातावरणात आमचे हितगुज रंगत जाते. हात रांगोळी काढत असतात, पण मनातील भावनांचीही एक सुंदर रांगोळी त्या संवादातून उमटत असते.

दिवसभरात मनात साचलेले अनेक विचार, चिंता, आनंदाचे क्षण किंवा एखादी खंत आम्ही एकमेकींशी मनमोकळेपणाने बोलतो. आश्चर्य म्हणजे एकमेकींशी बोलून झाल्यावर मनावरचा



ताण हलका झाल्यासारखा वाटतो. जणू काही मनावरील ओझे कुणीतरी अलगद उतरवून घेतले आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात मन मोकळे करण्यासाठी अशी व्यक्ती लाभणे हे खरोखरच भाग्याचे लक्षण आहे.

श्रद्धाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ती माझ्या मनातील भावना शब्दांशिवाय ओळखते. माझ्या चेहऱ्यावरचा आनंद, डोळ्यांतील चिंता किंवा मनातील अस्वस्थता तिच्या नजरेतून कधीच सुटत नाही. मी काही बोलण्यापूर्वीच ती विचारते, ‘‘काय गं, काय झालं, ठीक आहेस ना?‘‘ तिच्या या एका प्रश्नात इतकी आपुलकी असते की मन नकळत मोकळे होते. माझ्या आनंदात ती मनापासून आनंदी होते आणि माझ्या दुःखात ती माझ्या पाठीशी खंबीरपणे उभी राहते.

तिचा स्वभाव इतका सुंदर आहे की तिच्या घरात एखादे साधे फूल फुलले तरी ती ते माझ्यासाठी घेऊन येते. एखादा पदार्थ केला तर त्यातील वाटा माझ्यासाठी राखून ठेवते. आपल्या घासातील घास दुसऱ्याला देण्यातच खरा आनंद आहे, हे तिच्या वागण्यातून दिसून येते. तिच्या छोट्या-छोट्या कृतींमधून तिच्या मनातील प्रेम, जिव्हाळा आणि निस्वार्थ भावना जाणवतात.

श्रद्धाचा आणखी एक गुण म्हणजे तिचा हसतमुख आणि आनंदी स्वभाव. ती अगदी निष्कपटपणे माझी फिरकी घेते. तिच्या त्या निरागस चेष्टा-मस्करीमुळे वातावरणात आनंद पसरतो. कितीही तणाव असला तरी तिच्याशी दोन शब्द बोलले की चेहऱ्यावर हसू उमटते. तिच्या सहवासात वेळ कसा निघून जातो ते कळतच नाही.तिला माझे कौतुक पण खूप आहे,ती मला नेहमी प्रोत्साहित करते.

आजच्या स्वार्थी आणि धकाधकीच्या जगात अशी निस्वार्थ मैत्री दुर्मिळ झाली आहे. प्रत्येक नात्यामागे काहीतरी अपेक्षा असतात, पण आमच्या मैत्रीत अपेक्षेपेक्षा आपुलकी जास्त आहे. विश्वास, प्रेम, समजूतदारपणा आणि जिव्हाळा या चार स्तंभांवर आमची मैत्री उभी आहे.

देवाने प्रत्येकाच्या आयुष्यात अशी एक तरी सखी द्यावी, जी मनातील न बोललेले शब्द ऐकेल, डोळ्यांतील भावना ओळखेल आणि सुख-दुःखाच्या प्रत्येक वळणावर हातात हात घालून सोबत चालेल. मला अशी सखी लाभली याबद्दल मी स्वतःला भाग्यवान समजते.

श्रद्धा हे तिचे नाव असले तरी माझ्यासाठी ती केवळ व्यक्ती नाही; ती विश्वास आहे, आधार आहे, गारवा आहे आणि आयुष्याला सुंदर बनवणारी ईश्वराने दिलेली एक अनमोल भेट आहे.


सौ. रेवती राहुल मोहरीर
(सहशिक्षिका)
केएलई इंग्लिश मीडियम स्कूल,
जुळे सोलापूर, सोलापूर
मो. 8928348598






# जात्यावरच्या ओव्या......

बैलपोळ्याचा सण
आनंदात घरदार
थप्पी लागली पोत्याची
अरे त्याच्या जीवावर ||८६२||

बैलपोळ्याचा सण
भाऊ राबतो संगती
तव्हा होत पीकपाणी
उठती बसती पंगती ||८६३||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७६

ज्योतिर्मय साहित्य

आता कालमान बदलले आहे. पूर्वीप्रमाणे लोकांना योग, याग, तप करणे जमणार नाही हे ओळखून त्यांनी परमेश्वर प्राप्तीसाठी लोकांच्या हाती नामस्मरणाची गुरुकिल्ली दिली. आपल्या वाट्याला आलेल्या कर्माचे जेवढया चांगल्या प्रकारे शक्य होईल तसे पालन करा, आपण जे काही धार्मिक विधी करतो, त्यात काही तरी अपूर्णता राहून जाण्याची शक्यता असते. म्हणून आपण शेवटी म्हणतो, '' आवाहनं न जानामी, न जानामी तव अर्चनं...'' असे म्हणून परमेश्वराची क्षमा मागतो आणि काही अपूर्ण राहिले असेल ते पूर्ण करून घे अशी प्रार्थना करतो. म्हणूनच धर्म, योग, याग या गोष्टी पूर्णपणे जशाच्या तशा पालन करणे जमणार नाही हे समर्थ जाणतात. पण या सगळ्यात एकच महत्वाची गोष्ट लक्षात ठेवा असे त्यांचे सांगणे आहे. ती गोष्ट कोणती ? तर ते म्हणतात,''म्हणे दास विश्वास नामी धरावा.'' इतर गोष्टी जशा जमतील तशा करा. पण नामावर विश्वास ठेवून नामस्मरणाचा सोपा मार्ग अवलंबा असेच त्यांचे सांगणे आहे. संत ज्ञानेश्वर महाराज देखील म्हणतात, '' एक तत्व नाम दृढ धरी मना, हरिसी करुणा येईल तुझी.'' तेव्हा सर्व संतांचे सांगणे एकच आहे. परमेश्वराचे नाम भक्तिभावाने घ्या. जणू तो समोर उभा आहे अशी कल्पना नाम घेताना करा. तुकाराम महाराज म्हणतात,''नाम उच्चारिता कंठी, पुढे उभा जगजेठी । ऐसे धरोनिया ध्यान, मनी करावे चिंतन.'' तेव्हा अशा प्रकारे प्रभात समयी श्रीरामाचे चिंतन करा.






स्वसंवाद :

१. विविध ग्रंथांचे मतमतांतर आणि संभ्रम यात अडकून न पडता, मी समर्थांनी सांगितलेल्या नामावरील विश्वासाची गुरुकिल्ली स्वीकारायला तयार आहे का?

२. ''आवाहनं न जानामी'' म्हणताना माझ्या मनात माझ्या अपूर्णतेची जाणीव आणि भगवंताप्रती संपूर्ण शरणागती असते का?

३. तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे, मुखात नाम घेताना प्रत्यक्ष जगजेठी (परमेश्वर) माझ्या समोर उभा आहे, अशी अनुभूती घेण्याचा मी कधी प्रयत्न करतो का?

४. या १० श्लोकांच्या मालिकेतून मी नेमके काय शिकलो? उद्यापासून माझ्या मनात राम चिंतनाची नवी पहाट होईल का?

**(क्रमशः)**






## || संजय उवाच... ||

@संजय काव्या पुणे 7743918559

एकाग्रता

कोणतेही काम करताना एकाग्रता खूप महत्वाची असते, आपण जे काम करतोय त्या कामावर जर पूर्ण लक्ष केंद्रित केले तरच ते यशस्वी होते. म्हणून कामावरचे एकाग्रता कधीच विचलित होऊ देऊ नका मग तुम्ही जिंकलाच म्हणून समजा.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# नामाचे सूक्ष्म स्वरूप

ज्योतिर्मय साहित्य

नुसते 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य 'नोकरी नोकरी' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. 'रामनाम' आणि 'नोकरी' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. 'राम राम' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वत:च्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा 'राम राम' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ' राम राम ' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे 'नोकरी नोकरी' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण 'राम राम' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. 'राम राम' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा 'नोकरी नोकरी' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच 'राम राम' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता' राम राम' जपावे.

मनाच्या सर्व दु:खाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच: प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. 'मी' पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदु:खाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.

***

# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

## आपले सण आपले उत्सव
## पितृपक्ष

माणसाचे ऐहिक जीवन सुख-समृद्धीचे, प्रसन्नतेचे, व शांती समाधानाचे असावे, असा विचार करून, माणसाला आपल्या धर्म शास्त्रा द्वारे तीन कर्मे नित्य आचरणात आणण्या बद्दल सुचविले आहे.

आपणाला तीन दिवस ऋणातून मुक्त व्हावे लागते. एक देव ऋण दोन पितृऋण व तीन ऋषी ऋण.

आपल्या पूर्व काळातील ऋषीमुनींनी, पिढ्यानपिढ्या आपले जीवन व्यवस्थित चालावे म्हणून, समाज जीवनात नियम बद्धता असावी, अनुचित प्रकार होऊ नयेत, व प्रत्येकाच्या सहकार्याने सर्वांचे जीवन सुसंपन्न व्हावे म्हणून खूप कष्टपूर्वक निती नियम बनवले आहेत.

ज्या देवतांच्या स्तुतिने त्या देवता प्रसन्न होतील व आपले इह लौकिक व पारलौकिक कल्याण होईल यासाठी त्यांनी ध्यानावस्थेत वेदमंत्र ऐकले व आपल्याला ते श्रद्धापूर्वक म्हणण्यासाठी उपलब्ध करून दिले.

आपल्या जीवनात आपले पूर्वज जे आज मरण पावले आहेत, त्यांनाही काही अन्न पाण्याची आवश्यकता असते, त्यासाठी त्यांचे प्रति कृतज्ञता भाव व्यक्त करावा व ते सध्या ज्या लोकांना वास्तव्यास आहेत, तिथे त्यांना अन्न पाणी पुरेसे मिळावे, त्या द्वारे त्यांची तृप्ती व्हावी म्हणून श्राद्धविधी करण्यासाठी ऋषींनी आपणास सांगितले आहे. या ऋषींच्या प्रती आपला आदरभाव व कृतज्ञता भाव व्यक्त करण्यासाठी तर्पण करणे गरजेचे असते. ( क्रमश:)




## रूप आणि कर्तृत्व

मित्रांनो आणि समस्त वाचक बंधूभगिनीनो, आज आपल्या या तरंगाच्या छोटेखानी लेखनात मी तुम्हाला माणसाचे रूप व कर्तृत्व या दोन शब्दाबद्दल माझ्या बुद्धीनुसार माहिती देतो. माणसाला जसे दोन हात, दोन पाय, डोळे दोन फुफ्फुसे देवाने दिले तसेचदोन मनेही दिली, हे आपण जाणतोच. अनेक वेळा आपण कोणत्या मनाचे ऐकावे याच्या चक्रात सापडतो, अगदी तसेच हे ऊपरोक्त दोन शब्द एकमेकासी निगडीत आहेत. "रूप"म्हणजे बाह्य रूप, ठेवण, दिसणे, अंगकांती वगैरे वगैरे. तर "कर्तृत्व" हा शब्द "माणसाचे कार्य" या अर्थाने अभिप्रेत आहे. दुसरा माणूस कोणत्याही माणसाचे हे दोन रूपे पाहतो, अनुभवतो. काय बरोबर ना.. इथं स्त्रीपुरुष असा भेद नाही. बाह्यरूप पाहण्यार्याला आकर्षित करते. पण त्याचे कर्तृत्व पाहणार्याला बदलून टाकते हा दोहोतला मुलभुत फरक. मग सांगा बरे महान कोण? रूप का कर्तृत्व? म्हणूनच खरे सौंदर्य दिसण्यात नसून ते सुदंर घडण्यात असते! असे मला वाटते. आपल्या नंतरही आपल्या कार्याची एखादी लहानसी पणतीही कुणाच्या वाटेला प्रकाश देत राहावी.म्हणून सौंदर्य बाह्य रूप यापासून दूर राहू या.. एखाद्या दु:खी माणसा जवळ बसू या... एखाद्या स्वप्नाला हात देऊ या... एखादे सुदंर कार्य करूया.. हाच रूपाचा सौंदर्याचा खरा अर्थ. कारण मित्रांनो चेहरा सुदंर असणे ही निसर्गाची देणगी आहे पण आपल्यामुळे दुसर्याचे जीवन सुदंर होणे हीच आपल्या कर्तृत्वाची कमाई! तीच जगण्याची, जीवनाची सार्थकता होते. चेहर्याचे रूप काळानुरुप बदलते पण विचार, कर्तृत्व, करूणा आणि माणूसकीने उजळलेले कर्तृत्व काळाला मागे टाकते.. ईथंच थांबतो. सुप्रभात. आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना.



# गुणकारी आलं (अद्रक )

ज्योतिर्मय साहित्य

आल्याचा वापर करून शरीरातील युरीक ॲसिड  करू शकता कमी, जाणून घ्या सेवनाची पद्धत

आजकाल शरीरात यूरिक ॲसिड वाढणं ही एक कॉमन समस्या झाली आहे. खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी आणि चुकीची लाइफस्टाईल यामुळे अनेकांना ही समस्या होते. जेव्हा शरीरात यूरिक ॲसिड वाढतं तेव्हा सांधे, जॉईंट्समध्ये वेदना आणि सूज अशा समस्या होतात. जर वेळीच यावर उपचार केले नाही तर ही समस्या आणखी वाढू शकते. यूरिक ॲसिड कंट्रोल करण्यासाठी तुम्ही काही घरगुती उपायही करू शकता. जवळपास सगळ्याच किचनमध्ये मिळणारी एक गोष्टी ही समस्या दूर करू शकते. ही गोष्ट म्हणजे आलं.

यूरिक ॲसिड कमी करतं आलं

आल्याच्या चहापासून ते वेगवेगळ्या पदार्थांमध्ये समावेश केला जातो. याने पदार्थांची टेस्ट तर वाढतेच सोबच यात अनेक औषधी गुणही असतात. यातील अँटी-इन्फ्लेमेटरी आणि अँटी-ऑक्सिडेंट ने शरीरातील सूज कमी होते. तसेच आल्याने पचनक्रियाही चांगली होते. शरीरातील विषारी पदार्थ सुद्धा बाहेर निघण्यास मदत मिळते.

आलं कसं करतं काम?

आल्यामध्ये जिंजरोल्स नावाचं एक शक्तीशाली तत्व असतं, जे शरीरात यूरिक ॲसिड जमा होण्यापासून रोखतं. हे तत्व यूरिक ॲसिडचे क्रिस्टल बनण्याची प्रक्रिया हळूवार करतं. ज्यामुळे जॉईंट्समध्ये वेदना आणि सूज कमी होते. तसेच याच्या मदतीने शरीरात रक्तप्रवाह सुद्धा सुरळीत होतो. इतकंच नाही तर शरीरातील विषारी पदार्थ सुद्धा बाहेर निघतात.

आल्याचं सेवन करण्याची योग्य पद्धत

आल्याचं सेवन वेगवेगळ्या प्रकारे तुम्ही करू शकता. मात्र, याचा योग्य पद्धतीने वापर करणं गरजेचं आहे. तेच जाणून घेऊया...

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

आल्याचा चहा

आल्याचा चहा यूरिक ॲसिड कमी करण्यासाठी एक बेस्ट उपाय आहे. यासाठी ताज्या आल्याचे छोटे-छोटे तुकडे करा आणि ते पाण्यात उकडून घ्या. तुम्हाला हवं तर तुम्ही यात थोडं मध आणि लिंबाचा रसही टाकू शकता. याच चहाचं दिवसातून दोन वेळा सेवन करा.

आलं आणि हळदीचं मिश्रण

आलं आणि हळद दोन्हींमध्ये अँटी इन्फ्लेमेटरी गुण भरपूर असतात. या दोन्हींचं मिश्रण करून एक पेस्ट बवा आणि ही पेस्ट कोमट पाण्यात टाकून सेवन करा. याने यूरिक ॲसिड कमी करण्यास मदत मिळते.

आल्याचा रस

ताज्या आल्याचा थोडा रस काढून त्यात थोडा लिंबाचा रस टाका. हा रस सकाळी रिकाम्या पोटी सेवन करा. याने शरीर आतून डिटॉक्स होईल आणि यूरिक ॲसिडही कंट्रोल होईल.

आल्याचं तेल

आल्याचा तेलाचा सुद्धा तुम्हाला जॉईंट्समधील सूज आणि वेदना कमी करण्यास करू शकता. या तेलाने जॉईंट्सवर हलक्या हाताने मालिश करा. याने ब्लड सर्कुलेशन चांगलं होतं आणि वेदनाही कमी होतात.

काय काळजी घ्या?

आल्याचं जास्त सेवन केल्याने पोटात जळजळ होऊ शकते. त्यामुळे याचं सेवन कमी प्रमाणात करा.

जर तुम्हाला आरोग्यासंबंधी एखादी गंभीर समस्या असेल तर आल्याचं सेवन करण्याआधी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

भावपुष्प

हळव्या,कोमल मनाने
नित्य नियमाने देवास
भावपुष्प अर्पण करते
चरणी डोके ठेवून
नतमस्तक उभे राहूनी
मनोभावे प्रभूस वंदिते

शब्दा शब्दांची अलवार
सुंदर,छान माळेत
भावपुष्प मनातले गुंफते
साधी सोपी रचना
शब्द मऊ मखमली
वाचताना मन आनंदते

# राजीव गांधी महाविद्यालयात माहिती अधिकार दिन उत्साहात साजरा

**ज्योतिर्मय साहित्य**

करमाड - राजीव गांधी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, करमाड ता.जि. छत्रपती संभाजीनगर येथील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी ''माहिती अधिकार दिन'' कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. एस. मुळे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. जयश्री पाटील तर प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य प्रा. मनोज देवकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.



प्रास्ताविकातून प्रा. डॉ. रमेश कचरे यांनी माहिती अधिकार दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यानंतर प्रा. डॉ. जयश्री पाटील यांनी ''माहिती अधिकार'' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. माहिती अधिकारामुळे प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढण्यास मदत होते. नागरिकांनी आपल्या अधिकारांची जाणीव ठेवून त्याचा जबाबदारीने वापर करावा, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रो. डॉ. एस. एस. मुळे यांनी माहिती अधिकार हा लोकशाही व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी संविधानिक मूल्ये आणि नागरिकांच्या अधिकारांचा अभ्यास करून जागरूक नागरिक बनावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. किशोर काळे यांनी केले, तर प्रा. प्रशांत माठे यांनी आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बुद्धिबळ स्पर्धेत स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या सहा खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड

**ज्योतिर्मय साहित्य**

जळगाव (गोकुळसिंग राजपूत) : शालेय जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत १९ वर्षे वयोगटात आपले वर्चस्व सिद्ध केले. मुलांच्या गटात कार्तिक कासार याने द्वितीय, अंकित दुग्गड याने चतुर्थ, तर निशांत साळी याने पाचवा क्रमांक पटकावला. मुलींच्या गटात ऐश्वर्या चौरसिया हिने प्रथम, दिशा चांडक हिने द्वितीय, तर शर्वरी भुजबळ हिने तृतीय क्रमांक मिळविला.

या उल्लेखनीय कामगिरीमुळे स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या या सहाही खेळाडूंची विभागीय स्तरावरील बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जिल्हास्तरावर मिळविलेल्या या यशामुळे



महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

खेळाडूंना क्रीडा शिक्षक डॉ. रणजीत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी सातत्यपूर्ण सराव व उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विभागीय स्पर्धेतील प्रवेश निश्चित केला.

या यशाबद्दल महाविद्यालयात तसेच पालक आणि क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झालेल्या सर्व खेळाडूंवर विविध स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

खेळाडूंच्या यशाबद्दल डॉ. केतन नारखेडे (प्रभारी प्राचार्य, एम.जे. स्वायत्त महाविद्यालय), प्रा. आर. बी. ठाकरे (समन्वयक, के.सी.ई. सोसायटी कनिष्ठ महाविद्यालय), प्रा. स्वाती बऱ्हाटे (समन्वयक, के.सी.ई. सोसायटी कनिष्ठ महाविद्यालय), प्रा. राजश्री महाजन (उपप्राचार्य), प्रा. शिल्पा सरोदे (पर्यवेक्षिका), प्रा. उमेश पाटील (समन्वयक, कला व वाणिज्य शाखा), प्रा. गुणवंत वंजारी (समन्वयक, विज्ञान शाखा) तसेच प्रा. वर्षा पाटील (चेअरमन, जिमखाना समिती) यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# कुलस्वामिनी प्रतिष्ठानच्या ४१ फुटी इको-फ्रेंडली देखाव्यास भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## भगवान बाबा आश्रमातील विद्यार्थिनींसाठी देखावा दर्शन व स्नेहभोजन!



**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - कुलस्वामिनी प्रतिष्ठान गणेश मंडळाच्या वतीने यंदा साकारण्यात आलेल्या ४१ फूट भव्य झाडामधील इको-फ्रेंडली गणेश देखाव्याने शहरवासीयांचे विशेष लक्ष वेधून घेतले. या उपक्रमांतर्गत मंडळाच्या वतीने भगवान बाबा आश्रमातील जवळपास ५० विद्यार्थिनींना विशेष आमंत्रित करून गणेश देखावा दर्शन घडवण्यात आले. हा नयनरम्य व निसर्गपूरक देखावा पाहून आश्रमातील सर्व विद्यार्थिनी भारावून गेल्या. या प्रसंगी या विद्यार्थिनींसह सिडको परिसरातील गरीब व गरजू भाविक अशा जवळपास २०० जणांना मंडळाच्या वतीने स्नेहभोजनाचे देण्यात आले.

पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणाऱ्या या नाविन्यपूर्ण देखाव्यास राज्याचे कॅबिनेट मंत्री मा. अतुलजी सावे, डॉ. भागवतजी कराड, मनपा आयुक्त श्री. अमोल येडगे, उपजिल्हाधिकारी श्री. विधाते सर, उपायुक्त श्री. भोंबे सर, भाजप शहराध्यक्ष श्री. किशोरजी शितोळे, मनपा स्थायी समिती सभापती अनिलजी मकरिये, बापू घडामोडे, अजिंक्यजी सावे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, नगरसेवक व हजारो भाविकांनी प्रत्यक्ष भेट देऊन मंडळाच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.

**वृक्ष संवर्धनाचा संदेश व कृत्रिम तलावात विसर्जन**

सामाजिक व पर्यावरणीय भान जपत देखावा पाहण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक भाविकाला मंडळाच्या वतीने एक झाडाचे रोप भेट देऊन वृक्ष संवर्धनाविषयी जनजागृती करण्यात आली. तसेच विसर्जन दिवशी गणेश स्थळी उभारण्यात आलेल्या कृत्रिम तलावात परिसरातील असंख्य नागरिकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने श्रींचे विसर्जन केले. या प्रसंगी उपस्थित सर्व भाविकांना चणा डाळीचा प्रसाद वितरित करण्यात आला.

हा संपूर्ण उत्सव व सामाजिक उपक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष विलास कोरडे, सौ. अलका कोरडे, अविराज कोरडे, संजय राठोड, अनिल गावंडे, प्रल्हाद गायकवाड, नरवाडे नाथा यांच्यासह सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# नम्रता क्रिस्टल पार्क गणेश मंडळाच्या वतीने समुदायिक अथर्वशीर्ष पठण संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - पुणे येथील रहाटणी येथे नम्रता क्रिस्टल पार्क मधील गणेश मंडळाने लहान मुले मुली, पासून ज्येष्ठ सदस्य सर्वांना सहभाग घेता येईल अशा विविध स्पर्धांचे आयोजनकेले होते. गीतगायन, नृत्य, स्लो सायकलिंग, रनिंग, चमचा लिंबू, वक्तृत्व स्पर्धा,बॅडमिंटन, स्पर्धा तसेच,युवकांचा सर्वांगीण विकास साधला जावा,यासाठी खास स्पर्धा घेतल्या, विशेष म्हणजे क्लब हाऊस मध्ये सामुदायिक गणपती अथर्वशीर्ष पठण घेण्यात आले यामध्ये वय वर्ष पाच अशा बालकापासून ते ७५ वर्षाच्या वयातील ज्येष्ठ महिला पुरुष मंडळी असे एकूण ७५जण स्वयं स्फूर्तीने सहभागी झाले होते. तसेच यावर्षी विशेष म्हणजे ''होम मिनिस्टर ''अर्थात,''खेळ पैठणीचा'' याचे सुरेख आयोजन करण्यात आले होते, सोसायटी मध्ये होम गणपती डेकोरेशन आणि इको फ्रेंडली डेकोरेशन स्पर्धा संपन्न झाल्या ,अशा सर्व स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना आणि विजेत्या संघ यांना ज्येष्ठ सदस्य यांच्या शुभहस्ते विविध बक्षिसांचे वाटप करण्यात आले. शेवटी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, ढोल ताशा लेझीम पथकाने पारंपरिक खेळाचे प्रदर्शन केले .गणेशाचे सोसायटीतील टब मध्येच विसर्जन करण्यात आले यासाठी नम्रता क्रिस्टल पार्क मधील सर्व पदाधिकारी सांस्कृतिक मंडळ,आणि गणेश मंडळ यांच्या सर्व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.






## सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**

# विचार ते विजय



लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013

## संकट म्हणजे शेवट नव्हे, नवी सुरुवात...

अपयश आलं तर स्वतःला संपलेलं समजू नका.
नुकसान झालं तर अनुभवाची किंमत विसरू नका.
मन खचलं तर मदत मागण्यास संकोच करू नका.
आणि पुन्हा सुरुवात करताना ती लहान आहे म्हणून स्वतःला कमी लेखू नका.
कारण मोठ्या प्रवासाची सुरुवात अनेकदा एका छोट्याशा पावलानेच होते.
कदाचित आज तुमच्या आयुष्यातही एखादं संकट उभं असेल. मन थकलं असेल. डोळ्यांत अश्रू असतील. उद्याची वाट धूसर दिसत असेल.
तरीही स्वतःला एक संधी द्या.
आजचा दिवस कठीण असू शकतो; पण उद्याची शक्यता अजून संपलेली नाही.
आयुष्याने तुम्हाला खाली पाडलं असेल, तर स्वतःचा हात स्वतः धरा. गरज पडल्यास आपल्या माणसांचा आधार घ्या. थोडं थांबा, श्वास घ्या आणि पुन्हा एक पाऊल पुढे टाका.
कारण कधी कधी आपण ज्या संकटाला आयुष्याचा शेवट समजतो, तेच संकट आपल्याला स्वतःची नवी ओळख करून देत असतं. "आयुष्यात एखादा दरवाजा बंद झाला म्हणून प्रवास संपत नाही; कधी कधी तोच क्षण आपल्याला नव्या वाटेवर चालायला शिकवतो."
"कधी कधी आयुष्य आपल्याकडून सगळं हिरावून घेतं असं वाटतं... पण अशाच क्षणी आपल्या आत दडलेली पुन्हा उभं राहण्याची ताकद आपल्याला भेटते."
आयुष्याचे पुस्तक एकाच पानावर कधीच संपत नाही. एखादे संकट म्हणजे केवळ एका पानावरील पूर्णविराम असतो; पण पुस्तक अजून बाकी आहे. त्या पुढच्या पानावर काय लिहायचे—हताशा की पराक्रम—हे संपूर्णपणे तुमच्या हातात आहे.
त्यामुळे, डोळ्यांतील अश्रू पुसा, छाती ठोकून उभे राहा आणि त्या वादळाला सामोरे जा. कारण लक्षात ठेवा, संकटाची रात्र जितकी गडद असेल, तितकाच तुमच्या 'विचार ते विजय' या प्रवासातील यशाचा सूर्य अधिक तेजस्वीपणे उगवणार आहे!

# ॥ श्री गणेश चिंतन ॥



*समर्थ रामदास स्वामी कृपेने मनाचे श्लोक व दासबोधाच्या आधाराने "गणेश उत्सवात १० दिवस नियमित एक गणेश चिंतन करू या कारण "जो स्वतः शुभ झाला तोच शुभारंभ करू शकतो"*

कृतज्ञ मी कृतार्थ मी, भगवंत हृदयस्थ आहे 🙏 अपर्णा परांजपे कात्रज पुणे

आणि पुढे—
जे उठवी शब्दांकुर । वदे वैखरी अपार ।
जे शब्दाचें अभ्यांतर । उकलून दावी ॥२॥
आता किती सुंदर क्रम आहे!
गणेशस्तवन
बोधरूप गणेश
↓
शारदास्तवन
शब्दाच्या अंतरंगाचा उलगडा करणारी शारदा
↓
पुढे सद्गुरुस्तवन
स्वरूपाचा प्रत्यक्ष बोध
दासबोधाच्या अनुक्रमणिकेत हेच क्रमाने येते—गणेशस्तवन → शारदास्तवन → सद्गुरुस्तवन → संतस्तवन.
६. "शब्दाचे अभ्यंतर उकलून दावी" — इथेच आपला अभ्यास आहे
ही ओवी तर आपल्या अभ्यासासाठी विलक्षण आहे
जे शब्दाचें अभ्यांतर । उकलून दावी ॥
शब्द फक्त उच्चार नाही. शब्दाच्या अंतरंगात अर्थ आहे.
आणि अर्थाच्या अंतरंगात तत्त्व आहे.म्हणून
समर्थांची पद्धत अशी दिसते—शब्द → अर्थ → तत्त्व → अनुभव
७. "विद्या" आणि "अविद्या" यावर समर्थांची विलक्षण ओवी
शारदास्तवनातील तिसरी ओवी—
जे योगियांची समाधी । जे धारिष्टांची कृतबुद्धी ।
जे विद्या अविद्या उपाधी । तोडून टाकी ॥३॥
ही ओवी गणेशस्तवनाशी जोडली तर अत्यंत गहन अर्थ निर्माण होतो.
गणेश—"अज्ञानभ्रांतिछेदका"
शारदा—"विद्या अविद्या उपाधी तोडून टाकी."
म्हणजे समर्थांच्या दृष्टीने अंतिम अवस्था विद्वत्ता नाही.
विद्या देखील एका टप्प्यावर उपाधी होऊ शकते. किती विलक्षण!
"मला पुष्कळ माहीत आहे" हा अहंकारही बंधन होऊ शकतो.
म्हणून—अविद्या दूर करणे आवश्यक आहे; पण शेवटी "मी विद्वान आहे" ही विद्येची उपाधीही ओलांडावी लागते.
हेच वेदान्ताचे अत्यंत सूक्ष्म तत्त्व आहे.
८. मग गणेशाची उपासना कुठे घेऊन जाते?
इथे पुन्हा शेवटची ओवी आठवूया—
वांछा धरूनि चित्तीं । परमार्थाची ॥



# महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

## 'आई-मुलगी' (बिंब आणि प्रतिबिंब)

पुढे....

प्रसंग पडला तर आजारी आईसाठी ही लाडकी लेक आपल्या नवऱ्याला किंवा आईकडे दुर्लक्ष करणाऱ्या आपल्या भावालाही चार खडे शब्द सुनावण्याचा अधिकार गाजवते; कारण ती दोन्ही घरांना जोडणारा भक्कम सांधा असते.

आज काळ बदलला आहे; मुलगा आणि मुलगी आपण समान मानतो आहोत. पण जुन्या काळात मुलगी झाली की घरामध्ये बऱ्याचदा नाराजी व्यक्त व्हायची. पण आई...? आईला मात्र तिची मुलगी काळजाचा तुकडा वाटायची. एका जुन्या ओवीत आई आपल्या मुलीचे कौतुक करताना म्हणते—
"लेका गं परीस, लेक कशियाने उणी,
गुणांची लेकीबाई, हिरा नव्ह, हिरकणी!"
तर दुसऱ्या एका लोकगीतात आईचे थोरपण सांगताना लेक कृतज्ञतेने म्हणते—
"गणगोतांमधी सये, माझी माऊली अधिक,
माझी मायबाई, शुद्ध गंगेचं उदक!"
कित्येक डॉक्टरेट (Ph.D.) या ओळींवरून ओवाळून टाकाव्यात, इतका मोठा भावनिक ठेवा या लोकगीतांतून ग्रामीण माऊलींनी आपल्याला दिला आहे. सगळ्या नात्यांपेक्षा आई अधिक श्रेष्ठ आणि कशी, तर साक्षात 'गंगेच्या निर्मळ उदकासारखी'!

अशी ही गंगेसारखी निर्मळ आई आपल्या जगण्याचा संपूर्ण वारसा मुलीला सोपवत असते. तिच्यात ती आपले प्रतिबिंब पाहते. संसारात स्वतः जे कष्ट आणि हालअपेष्टा भोगल्या, त्या आपल्या लेकीच्या वाट्याला येऊ नयेत म्हणून ती जीवाचा रान करते. आपल्या आयुष्यातील शहाणपण, समजूतदारपणा, क्षमाशीलता आणि संस्कार ती लेकीच्या पदरात भरभरून घालते. तिच्या मनात एकच प्रार्थना असते—माझी लेक सासरी सुखात राहावी, तिने दोन्ही कुळांचा उद्धार करावा आणि नाव उज्ज्वल करावे.

आई ही कुठेही असो; ती माणूस असो वा पशुपक्षी. ती भारतातली असो वा सातासमुद्रापलीकडची! पु. ल. देशपांडे यांच्या 'अपूर्वाई' या प्रवासवर्णनात ते इंग्लंडमधील एका आईचे उदाहरण देतात. (क्रमश:)

# जीवन जगण्याचा दृष्टिकोन आणि त्यातील विसंगती

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

हा प्रश्न अत्यंत कठीण आहे. मृत्यूच्या वेळी संपत्तीची किंमत बदलते, मृत्यूच्या क्षणी माणसाला आपल्या संपत्तीचे खरे मूल्य समजते. ज्याच्यासाठी आयुष्यभर धावपळ केली, ती संपत्ती मागे राहते.

ज्या पदासाठी संघर्ष केला, ते पद मागे राहते.ज्या घरासाठी आयुष्य खर्च केले, ते घरही मागे राहते. सोबत राहतात ती माणसांची आठवण, आपण केलेली चांगली कामे आणि आपण कोणाच्या जीवनाला किती स्पर्श केला? या साऱ्या गोष्टी.

म्हणूनच जीवनाचा प्रश्न ''मी किती मिळवले?'' एवढाच नसावा.

त्याबरोबर एक प्रश्न असायला हवा

मी किती जगलो?

आणि त्याहून महत्त्वाचा प्रश्न,

माझ्यामुळे दुसऱ्याचे जीवन किती सुंदर झाले?

माणसाचे मन भूतकाळ आणि भविष्यकाळात सतत फिरत असते.

भूतकाळातील चुका त्याला त्रास देतात आणि भविष्याची चिंता त्याला अस्वस्थ करते. परिणामी वर्तमान हातातून निसटतो,परंतु जीवन नेहमी वर्तमानातच घडते.काल निघून गेला आहे.उद्या अजून आलेला नाही.

आपल्या हातात आहे तो फक्त आजचा दिवस आणि हा क्षण. म्हणून वर्तमानाचा आनंद घेणे म्हणजे बेफिकीरपणे जगणे नव्हे. त्याचा अर्थ असा की जबाबदाऱ्या पार पाडताना जीवनातील छोट्या-छोट्या आनंदांकडेही दुर्लक्ष करू नये.

पावसाचा पहिला वास, सकाळचा चहा, मुलांचे हसू, मित्राचा फोन, आईचा आवाज, एखादे सुंदर पुस्तक, एखाद्या झाडाची सावली, आवडतं गाणं, नातवडांशी खेळणं.

हे क्षण लहान वाटतात, पण प्रत्यक्षात जीवन याच क्षणांनी बनलेले असते.



आजच्या जगात यशाची व्याख्या प्रामुख्याने पैसा, पद, प्रसिद्धी आणि संपत्तीशी जोडली जाते, पण आयुष्याच्या शेवटी यशाची व्याख्या बदलते.

तेव्हा प्रश्न असा नसतो की, तुमच्याकडे किती पैसा होता?

प्रश्न असतो. तुमच्यावर प्रेम करणारे किती लोक होते? तुम्ही कोणासाठी उभे राहिलात?

तुमच्या जाण्याने कोणाच्या डोळ्यात पाणी आले?

तुम्ही जगाला काय दिले? हीच खरी जीवनाची परीक्षा आहे,भलेही हे सारं मृत झाल्यावर कळत नसो पण

हे जिवंत असताना आपण केलेली चांगली

कामे मनाला आनंद आणि समाधान नक्कीच देतात.

खरे जगणे म्हणजे काय?

खरे जगणे म्हणजे प्रत्येक दिवस सुट्टीसारखा घालवणे नव्हे,

खरे जगणे म्हणजे जबाबदाऱ्या टाळणेही नव्हे, खरे जगणे म्हणजे आपल्या जबाबदाऱ्या स्वीकारूनही स्वतःला हरवून न बसणे.कुटुंबासाठी जगणे, पण स्वतःलाही वेळ देणे.पैसा कमावणे, पण आरोग्य गमावू न देणे, करिअर करणे,पण नाती तुटू न देणे.

भविष्याची तयारी करणे.

पण वर्तमानाचा आनंद न गमावणे, स्वप्ने पाहणे. आणि ती पूर्ण करण्यासाठी आजपासून सुरुवात करणे.




जीवनाची खरी संपत्ती आपण आयुष्यभर ''काय मिळवले?'' याची यादी तयार करतो.

पण एकदा ''काय दिले?'' याची यादी तयार करून पाहावी. आपण कोणाला मदत केली?कोणाला धीर दिला?

कोणाचे अश्रू पुसले?कोणाला संधी दिली?कोणाच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण केला?

यांची उत्तरेच आपल्या जीवनाचे खरे मूल्य ठरवतात.

कारण माणूस मृत्यूनंतर आपल्या वस्तूंमुळे मोठा होत नाही, तो आपल्या कृतींमुळे आठवला जातो.

''माणूस असा जगतो की कधी मरणार नाही आणि असा मरतो की कधी जगलाच नाही'' हे केवळ एक सुंदर वाक्य नाही; ते आपल्या जीवनाचा आरसा आहे.

मृत्यू अटळ आहे. पण मृत्यूपूर्वी आपण जगायचे की फक्त जगत असल्याचे भासवायचे, हा निर्णय आपल्या हातात आहे.

उद्यासाठी पैसा साठवावा पण आजचा आनंद गमावू नये.

भविष्यासाठी स्वप्ने पाहावी पण वर्तमानाला विसरू नये

यश मिळवावे , पण माणसे गमावू नये

मोठे व्हावे, पण मन छोटे होऊ देऊ नये

आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे

मृत्यू येईल तेव्हा ,मी अजून जगलोच नाही,अशी खंत राहू नये, यासाठी रोजचा दिवस मनापासून जगावा. कारण शेवटी जीवनाची लांबी आपल्या हातात नसते,पण त्या जीवनाची खोली आणि अर्थ आपल्या हातात नक्कीच असतो. हो ना?

# वर्षश्राद्ध तसेच पक्ष पंधरवडा...

**ज्योतिर्मय साहित्य**

तसे बऱ्याच जणांना वाटते की आपल्याला आता सगळे माहित आहे.

पण खरंच तसे नसते!

असे बऱ्याच वेळा म्हणतात की, जगातील असंख्य गोष्टींपैकी आपल्याला माहित असलेला भाग अगदीच छोटा आहे. कुठेतरी वाचले होते, साधारण चार टक्के माहिती आपल्याला असते असे म्हटले जाते. अर्थात हा आकडा कितपत खरा आहे माहित नाही!

गुगल किंवा नवीन तांत्रिक प्रगतीमुळे आज कोणतीही माहिती काही क्षणात मिळू शकते. पण त्यालाही काही मर्यादा आहेत असे वाटते!

एक मात्र नक्की...

आपल्याला माहित असलेल्या गोष्टींपेक्षा माहित नसलेल्या गोष्टी खूप जास्त आहेत...

आणि आजकाल तर आपला शेजारी काय करतो? त्याचे नाव काय? इतकेच नव्हे तर सोसायटीमध्ये राहणाऱ्यांपैकी कोणी गेले तरी आठ/आठ दिवस माहित होत नाही.

फ्लॅटमधून दुर्गंधी यायला लागल्यावर मग लक्षात येते...

म्हणून पण...

नवीन नवीन तांत्रिक प्रगतीमुळे सर्वांसमोर भावना आणि संवेदना जागृत ठेवण्याचे मोठे आव्हान आहे. त्यासाठी अनेक जण प्रयत्न करत आहेत असे दिसते.

अनेक रूढी, परंपरा यांच्या माध्यमातून हा प्रयत्न सुरू ठेवण्यासाठी आयोजन केले जाते आणि त्याचे महत्त्व कमी जास्त प्रमाणात दिसून येते...

सावडणे, दहावा, तेरावा, वर्षश्राद्ध हे



भारतीय संस्कृतीमध्ये केले जाणारे काही विधी!

त्यामध्ये असलेल्या कित्येक विविध जाती धर्मांतील परंपरा आपल्याला माहित नसतात. त्या माहित असायलाच पाहिजेत असेही नाही.




पण जेव्हा एखादा जवळचा मित्र किंवा मैत्रीण दुसऱ्या जाती धर्मातील असतो, तेव्हा त्याच्या घरातील काही परंपरांची माहिती होते...

मी माझ्या बहिणीकडे गेलो असताना माझी भाची आणि जावई घरी नव्हते. सहज विचारले तर ती म्हणाली,ते त्यांच्या मित्राच्या आईचे वर्षश्राद्ध असल्यामुळे तिकडे गेले आहेत...

वर्षश्राद्ध हा विधी आपण सर्वच आपल्या आपल्या पद्धतीने करतो.

त्यामध्ये अनेक संवेदनशील गोष्टी असतात. हृदयात कायम असणाऱ्या अनेक आठवणी, हृदयस्पर्शी घटना पुन्हा आठवल्या जातात. भावना व्यक्त होतात... तसेच पक्ष पंधरवडा...

आपल्या पूर्वजांच्या आठवणी या निमित्ताने पुढच्या पिढीपर्यंत पोहोचतात.

भावना, संवेदना, आठवणी आणि त्यानिमित्ताने होणारे धार्मिक विधी, परंपरा आणि प्रथा यांचा तो एक दिवस असतो...

मला अशाच एका वेगळ्या परंपरेबद्दल नुकतेच माहित झाले...

वर्षश्राद्ध... एक मोठे बॅनर... एक मोठा हॉल...

गेलेल्या व्यक्तीचा मोठा फोटो...

सगळ्या नातेवाईकांनी वर्षश्राद्धासाठी मुद्दाम परिधान केलेले नवीन कपडे...

सगळ्यांना आग्रह करून गोड जेवण...

वडील गेले असतील तर त्यांच्या नातेवाईकांना आवडणारे पदार्थ आवर्जून आणि आठवणीने केलेले...

आई गेली असेल तर तिच्या माहेरकडच्या पाहुण्यांना आवडणारे पदार्थ...

त्याचबरोबर त्यांना आवडणारी गाणी...

काही पारंपरिक गाणी... ऑर्केस्ट्रा...

आणि त्या गेलेल्या व्यक्तीच्या अनेक स्मृती सर्वांच्या चेहऱ्यावर...

खूप पूर्वी वाचले होते की, कोणत्या तरी देशात एका जमातीमध्ये कोणी गेले तर आनंद व्यक्त केला जातो. सगळेजण नाचत गात त्याचा अंत्यविधी करतात. जेव्हा त्यांना विचारले गेले तेव्हा त्यांनी सांगितले होते,

मृत्यू पावला म्हणजे तो आता देवाच्या घरी जाणार ना! मग त्याला निरोप आनंदाने द्यायला पाहिजे की नाही? कदाचित प्रत्येक समाजाची मृत्यूकडे पाहण्याची पद्धत वेगळी असेल...

पण माणूस म्हणून जगताना...

आपल्या भावना, संवेदना आणि एकमेकांशी असलेले नाते आपण जपतोय का?

तांत्रिक प्रगतीमुळे आपले जगणे खूप सोपे झाले आहे...

माहिती मिळवणे सोपे झाले आहे...

एकमेकांशी संपर्क साधणे सोपे झाले आहे...

पण माणूस म्हणून एकमेकांजवळ राहणे मात्र कुठेतरी अवघड होत चालले आहे असे वाटते...

वृद्धाश्रमातच आई-वडील मरून जातात... मुलांना वेळ नसतो! निवृत्तीनंतर घरी आनंदात राहणे हेही स्वप्न वाटायला लागते! येत्या काही वर्षांत तर... आई वडील तरी असतील का? लग्नच नको! जबाबदारी नको! आणि उगीचच त्या संवेदना! मुलं जन्माला येतीलही... पण आई-वडील?

# सुख म्हणजे काय?

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

खोटा अहंकार केव्हाही गळून पडतो, पैसा कमवा जरुरीपुरता सुखसोयी सुविधा जीवन आनंदात जगण्यासाठी उपयोगात आणा, पण कोणत्याही गोष्टीचा अतिरेक करु नका की, ज्यामुळे दुसर्याचे नुकसान होईल. सर्व माणसे स्वभावाने सारखी नसतात, जगात प्रेमळ, मायाळू समजुतदार माणसेही आहेत, जी दुसर्यांचा उत्कर्ष पाहून आनंदी होतात, कौतुक करतात. त्यांना प्रोत्साहन देतात, चांगले मार्गदर्शन करतात, अशा माणसांची साथ संगत धरा. परिवारात सर्वांनी सामंजस्याने राहून एकमेकांना मदत करा, पुढे जाण्यासाठी सहकार्य करा, त्यांच्या सुखदुःखात सामील व्हा. लहान मुले असतील तर त्यांच्याशी प्रेमाने वागून त्यांच्यावर चांगले संस्कार करा, त्यांना आदर्श मुले घडवा.




घरात जसे वातावरण असते, तशीच मुले घडतात. परिवारातील सर्व सदस्यांनी एकमेकांचा सन्मान राखणे, युवा वर्ग असेल त्यांनी ही वडिलधार्यांना मान देणे, लहान बालकानाही योग्य संस्कार देणे हे मोठ्या माणसांचे काम आहे. आपले कुटुंब हे प्रत्येकाने जपले पाहिजे.

तेथे एकमेकांप्रती सन्मान, आदर, समन्वय, सामंजस्य, सद्भावना, सुसंवाद असतील तरच ते आदर्श कुटुंब ठरते.

काही घरात तर पतीपत्नी या नात्यात दुरावा आणणारी घरितलीच माणसे असतात, दुसऱ्याची मुलगी सून म्हणून हक्काने घरात आणतात, पण ज्यावेळी तिच्या मनाचा, भावनांचा विचार करायची वेळ येते त्यावेळी तिच्या बाजूने कोणीच उभे नसते, ती एकटी पडते, आणि अशावेळी ती आधारासाठी माहेरीही जाऊ शकत नाही, त्या आगीत होरपळून ती स्वतः संपवण्याचा विचार करते, केवळ स्वार्थी, अहंकारी सासरच्या लोकांमुळे तिचा हकनाक बळी जातो. ती एकटीच मरणाची वाट पहात नाईलाजाने त्या घरात दिवस काढत असते. आईवडिलांना दुःख होऊ नये म्हणून ती अपमान सहन करीत तेथे रहात असते.

समाजातील प्रत्येक कुटुंबाने याचे भान ठेवायला पाहिजे, कुटुंब जोडून ठेवा, आपल्या विचित्र वागणुकीमुळे कुटुंबाला बाधा येईल असे वागू नका. सुनांनी पण सासरच्या माणसांचा आदर केला पाहिजे, त्यांना ही समजून घेतले पाहिजे, त्या घरातील चालिरीती समजून घ्यायला हव्यात, सर्वांशी प्रेमाने वागले पाहिजे, लग्न झाल्यानंतर त्या घरातील सुखदुःखाशी समरस व्हायला पाहिजे, तरच कुटुंब टिकेल.

आपले घर, कुटुंब आदर्श व्हायला हवे असेल तर हे आगदी साधे, सोपे, सहज नियम पाळले तर प्रत्येक कुटुंब आनंदी व सुखी समाधानी होईल.

# स्वातंत्र्यलढ्यातील तेजस्वी तारा - गंगाधरराव देशपांडे

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून) त्या काळात होमरूल ही संकल्पना सामान्य जनतेसाठी नवी होती. गंगाधरराव देशपांडे यांनी ती सोप्या भाषेत नागरीकांना समजाऊन सांगितली. भारतातील कायदे भारताच्या लोकप्रतिनिधींनी करावेत. भारतीयांना प्रशासनात आधिकार मिळावेत आणि देशाच्या संपत्तीवर भारतीयांचे नियंत्रण असावे, हा होमरुलचा मुलभूत अर्थ त्यांनी स्पष्ट केला. त्यांच्या प्रभावी भाषणांमुळे आणि संघटनक्षमतेमुळे कर्नाटकातील तरुणांचा ओघ राजकीय चळवळीत आला. टिळकांच्या होमरूल चळवळी दरम्यान देशपांडे यांनी बेळगाव आणि कर्नाटकात स्थानिक व्यवस्था केली. सभा, मिरवणुका आणि जनजागृती कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देशपांडे यांनी मोठी मेहनत घेतली. टिळकांचा प्रभाव महाराष्ट्राबाहेर कर्नाटकात अधिक वाढण्यासाठी देशपांडे यांनी मेहनत घेतली आणि तसा तो दृढ झाला.



१ ऑगस्ट १९२० या दिवशी लोकमान्य टिळक यांचे निधन झाले. टिळकांचे उजवे हात म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गंगाधरराव देशपांडे यांच्या जीवनातील हा मोठा धक्का होता. टिळकांच्या निधनानंतर भारतीय स्वातंत्र्यचळवळीचे नेतृत्व महात्मा गांधींच्या हातात आर्थिक दृढ झाले. देशपांड्यांनी गांधींच्या असहकार, सत्याग्रह आणि रचनात्मक कार्यक्रमांचा स्वीकार केला. मात्र त्यांच्या राजकारणाचा गाभा जो लोकमान्य टिळक यांच्याकडून त्यांनी जो स्वीकारला होता तोच राहिला.स्वराज्य-जनजागृती-स्वावलंबन आणि संघटन यासाठी गांधींच्या मार्गदर्शनाखाली देशपांड्यांनी असहकार चळवळीत भाग घेतला. परकीय शिक्षणसंस्था, न्यायालये, वस्तू आणि सरकारी सन्मान यांचा बहिष्कार करण्याचा संदेश त्यांनी दिला. त्यांनी गावोगावी सभा घेऊन लोकांना ब्रिटिश शासनाशी असहकार करण्यास प्रवृत्त केले. राष्ट्रीय शाळा, खादी केंद्रे आणि स्वयंसेवक संघटनांच्या उभारणीला त्यांनी मदत केली. देशपांडे यांच्या नेतृत्वात कर्नाटकात काँग्रेसचे संघटन मजबूत झाले. त्यांनी ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांना राजकीय शिक्षण दिले.




सत्याग्रहासाठी स्वयंसेवक तयार केले. लोकांनी तुरूंगवास, दंड आणि सरकारी दडपशाही सहन करण्याची मानसिक तयारी ठेवावी यासाठी त्यांनी सातत्याने प्रचार केला. गंगाधरराव देशपांडे यांच्या सार्वजनिक जीवनातील सर्वात मोठी कामगिरी म्हणजे १९२४ चे बेळगाव काँग्रेस अधिवेशन.हे अधिवेशन महात्मा गांधींच्या अध्यक्षपदी झालेले भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे एकमेव अधिवेशन होते.

**(क्रमशः)**




## हिंदीत मांडला 'गोंधळ'




"आम्ही मुंबईत स्टुडिओ बुक केलेला आहे आणि दोन दिवसांत तुम्हाला 'गोंधळ' या सिनेमातली गोंधळ घालणारी २३ गाणी हिंदीत भाषांतरित करायची आहेत..." असा फोन १६ नोव्हेंबर २०२५ रोजी मला आला. तेव्हा राज्य नाट्य स्पर्धेतील आमच्या नाटकाचा प्रयोग अवघ्या एका दिवसावर आला होता. दिवसभर तालमी सुरू होत्या. गाणी लिहिण्याचे काम इतक्या कमी वेळेत होईल की नाही, याचा विचार न करता मी होकार देऊन टाकला. मित्र कैलास लीला वाघमारे याने माझे नाव सुचवले होते. आणि कार्यकारी निर्माता राम बेंद्रीकर यांनी मला व्हाट्सअपवर मूळ मराठी गोंधळगीते पाठवायला सुरुवात केली.

१७ नोव्हेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ७ वाजता नाट्यांकुर व उत्कर्ष थिएटरच्या वतीने 'ती' या नाटकाचा प्रयोग होता. लेखक सतीश लिंगडे, दिग्दर्शक सुमीत शर्मा आणि आम्ही सर्व कलाकार कल्ला करण्याच्या बेताने मिनी बसमध्ये बसलो. बस जालन्याहून छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने निघाली. आता दणकेबाज गाणी लावून धिंगाणा घालू, असा आदेश दिग्दर्शकाने काढला. मात्र "मला 'गोंधळ' चित्रपटाची गाणी ऐकून ती लगेच हिंदीत करून पाठवायची आहेत. त्यामुळे तुम्ही बसमध्ये गाणी वाजवू नका." असे छानपैकी विरजण मी त्या उत्साहावर घातले. मग बिचारे सगळे चुळबुळत शांत बसले.

मी एकेक गाणे लिहून पाठवू लागलो. तिकडे लगेच त्याची प्रिंट काढून स्टँडला लावली जात होती आणि रेकॉर्डिंग सुरू झाले होते. (तसा गातानाचा फोटोही कैलास वाघमारे याने मुंबईहून मला व्हाट्सअपवर पाठवला.)

आम्ही छ. संभाजीनगरला तापडिया रंगमंदिरात दुपारी पोहचलो. मी एक रूम गाठली. गाणी लिहिणे सुरूच होते. इकडे रंगमंचावर नेपथ्य उभारले जाऊ लागले. मध्ये ब्रेक घेऊन सर्व कलावंत डबे खाऊ लागले. तरीही माझे काम सुरूच. (महाराष्ट्रातली पारंपरिक 'गोंधळगाणी' हिंदीत आणि त्याच चालीत लिहिणे म्हणजे खायचे काम नाही, हे तोवर माझ्या लक्षात आले होते.)

अशी दहा-बारा गाणी लिहून दिल्यावर मग शेवटी मी एकट्यानेच जेवण केले. मेकअपची वेळ होईपर्यंत गाणी लिहिणे चालूच होते. ऐन वेळी 'मुन्ना' या दुष्ट भूमिकेचा मेकअप केला. नाटक सुरू झाले आणि रसिकांच्या जोरदार प्रतिसादात संपले. (नंतर त्या नाटकाचा पहिला क्रमांकही आला.) रात्री एक-दोन वाजता केव्हातरी आम्ही जालन्यात पोहचलो. दुसऱ्या दिवशी कुठलाही श्रमपरिहार न करता उरलेली गाणी लिहिणे सुरू झाले आणि रात्री एकदाचे संपले.

त्यापूर्वीची गोष्ट...

'गोंधळ' सिनेमा मराठीत प्रदर्शित व्हायचा बाकी होता तेव्हा निर्माते, दिग्दर्शक संतोष डावखर यांच्या घरी रात्री मी कैलाससोबत गेलो होतो. तेव्हा ज्येष्ठ छायाचित्रणकार अमलेंदू चौधरी यांची दिग्दर्शकासोबत उत्साहात चर्चा सुरू होती. हे प्रकरण वेगळेच आहे हे तेव्हा लक्षात येत होते. अख्ख्या चित्रपटभर कैलासने अक्षरशः 'धुमाकूळ' घातलेला आहे. पुढे याच सिनेमाची हिंदी गाणी माझ्याकडे येतील असे वाटण्याचे तेव्हा काहीच कारण नव्हते. पण तसे झाले.

आज 'गोंधळ' ऑस्करवारीला गेला आहे. या चित्रपटाच्या संगीताला महान संगीतकार इलय राजा आणि अजय गोगावले यांचा परीसस्पर्श झालाय. सात भाषांमध्ये व्हिज्युअली डब झालेला हा जगातला पहिला सिनेमा आहे. याच सिनेमाच्या हिंदी आवृत्तीत आपलेही नाव असणे ही किती भारी गोष्ट आहे!

'गोंधळ' हिंदीत प्रदर्शित होईल तेव्हा नक्की पहा, गाणी ऐका. तारखेकडे लक्ष ठेवा...

- विनोद जैतमहाल.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559